## -: शुध्दीपत्रक :-

**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन-२०१८**
**पोलीस आयुक्त,नागपूर शहर**

**क्रमांक : पोआना/सआली-५/शुध्दीपत्रक/पो.भ-२०१८/२०१८** नागपुर, दिनांक ३०/०३/२०१८

पोलीस आयुक्त,नागपूर शहर या आस्थापनेवरील पोलीस भरती -२०१८ ची प्रकिया दिनांक ०९/०३/२०१८ पासुन सुरु करण्यांत आली असुन दिनांक २७/०३/२०१८ रोजी मैदानी चाचणीतील प्रकिया संपविण्यांत आली आहे.

मैदानी चाचणीतील प्रकिया पुर्ण झाल्याने दिनांक २८/०३/२०१८ रोजी लेखी चाचणी करिता पात्र उमेदवारांची यादी (एकुण उमेदवार ४०१७) जाहिर करण्यांत आलेली होती. सदर यादी बाबत कोणतेही उमेदवार यांना आक्षेप असल्यास त्यांनी ४८ तासाचे आंत (दि. ३०/०३/२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत) आक्षेप नोंदविणे बाबत सुचना देण्यांत आलेली होती.

त्यानुसार दिनांक २९/०३/२०१८ रोजी उमेदवार कुमारी निरुपा श्रावण बोकडे यांनी आक्षेप नोंदविला की, त्यांनी दिनांक २३/०३/२०१८ रोजी दिलेल्या मैदानी चाचणी मध्ये त्यांना ९० गुण प्राप्त झालेले होते, त्याप्रमाणे नागपूर शहर पोलीस दलाच्या ( http://nagpurpolice.gov.in ) वर सुध्दा त्यांना ९० गुण प्राप्त असल्याचे प्रसारीत करण्यात आल्याचे सांगितले, परंतु दिनांक २८/०३/२०१८ रोजी लेखी चाचणीकरीता प्रसारीत झालेल्या पात्रता यादीमध्ये त्यांना ६८ गुण दर्शविण्यात आल्याचे सांगितले, त्यानुसार उमेदवाराचे मूळ गुण पत्रक काढून पुन्हा तपासणी केली असता त्यांना ९० गुण असल्याचे दिसून आले, त्यानुसार त्यांचे गुणांमध्ये योग्य तो बदल करुन त्यांना समज देण्यात आली,

सदर प्रकरणांमुळे संपूर्ण गुणपत्रिकेची पुन्हा तपासणी केली असता दिनांक २३/०३/२०१८ रोजीच्या गुण तक्त्यामध्ये काही तांत्रिक चुका असल्याचे दिसून आल्या त्या खालीलप्रमाणे आहेत,

| अ क्र | चेस्ट क्रमांक | नांव | प्रवर्ग | चूकीचे गुण | योग्य गुण | कट ऑफ | लेखी परीक्षेकरीता पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १७६७९ | रुपाली सेवकराम सहारे | ओबीसी | ५६ | ७८ | ७४ | पात्र |

Scanned by CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | १७७४० | योगिता बसूराज शामकुवर | एस सी | ६४ | ८२ | ६८ | पात्र |
| ०३ | १७४०० | निरुपा श्रावण बोकडे | ओपन | ६८ | ९० | ६० | पात्र (पूर्वीपासून) |
| ०४ | १७६२० | प्रसिका रामकृष्णराव राउत | एस सी | ५७ | ५९ | ६८ | अपात्र |
| ०५ | १७९०० | सारिका संजय डहाके | एनटी बी | ५३ | ५७ | ७३ | अपात्र |
| ०६ | १८०९९ | अस्मिता धर्माजी वाहिले | ओबीसी | ६१ | ७५ | ७४ | पात्र |

वरिल नमूद प्रमाणे दुरुस्ती केल्यानंतर (अ.क्र.१,२,६) ०३ महिला उमेदवारांची नांवे लेखी परीक्षाकरीता पात्र उमेदवारांच्या यादीत समाविष्ठ केल्याने एकूण उमेदवारांची संख्या ४०१७ वरुन ४०२० अशी करण्यात आलेली आहे . त्यानुसार ०३ महिला उमेदवारांना फोनवरुन संपर्क करुन त्या लेखी परीक्षाकरीता पात्र असल्याचे कळविण्यात आलेले आहे, तसेच त्याची अपडेट माहिती ही वेबसाईटवर सुध्दा अपलोड करण्यात आलेली आहे

(रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी)
पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपूर शहर
यांचे करीता.

Scanned by CamScanner